महाराष्ट्र टाइम्स

१३ जानेवारी २०१६

# येऊरच्या 'वादग्रस्त' बांधकामाची चौकशी

**म. टा. वृत्तसेवा, ठाणे**

येऊरमधील आदिवासींची वहिवाट रोखणाऱ्या वादग्रस्त बांधकामाची दखल ठाण्याच्या जिल्हाधिकारी डॉ. अश्विनी जोशी यांनी घेतली असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आदेश तहसिलदारांना देण्यात आले आहेत. आदिवासींच्या तक्रारींची दखल घेत खुद्द जिल्हाधिकाऱ्यांनी या भागाची पाहणीसुध्दा केली आहे.



अनिल शिंदे



येऊर येथील पाटोणपाडा आणि जांभूळ पाडा या आदिवासी पाड्यांलगत १८ एकरांच्या जमिनीवर सुरू असलेल्या 'सुपरड्रीम्स रिअल इस्टेट लिमिटेड' कंपनी'च्या वादग्रस्त बांधकामाचे धक्कादायक वास्तव 'महाराष्ट्र टाइम्स'च्या वृत्तातून मांडले होते. तसेच, या बांधकामांमुळे ज्या आदिवासींची वहिवाट रोखली होती, त्यांनीसुध्दा जिल्हाधिकारी आणि पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. सहपोलिस आयुक्त व्ही. व्ही. लक्ष्मीनारायण यांनी दिलेल्या आदेशानंतर कापुरबावडी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस आयुक्त दिलीप गोरे यांनी मागील महिन्यात वादग्रस्त बांधकामाची पाहणी केली होती. आदिवासींची वर्षानुवर्षे असणारी वहिवाट संबंधित बांधकामामुळे बंद झाल्याने योग्य कागदपत्रांची तपासणी करून पुढील कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी त्यावेळी दिले होते. मात्र, त्यानंतर कोणतीही हालचाल होत नसल्याने स्थानिकामध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. मात्र, जिल्हाधिका-यांनी सोमवारी या वादग्रस्त बांधकामाची पाहणी केल्यानंतर रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

'सुपरड्रीम्स रिअल इस्टेट लिमिटेड' कंपनीने कागदपत्रात फेरफार करून जागा बळकावली आहे का, तसेच सरकारची जागा असूनही जागेवर बांधकाम कसे करण्यात आले, याची चौकशी करण्याचे आदेश तहसीलदार कार्यालयाला दिल्याचे जिल्हाधिकारी डॉ. अश्विनी जोशी यांनी 'मटा'शी बोलताना सांगितले.

जिल्हाधिका-यांनी वादग्रस्त बांधकामाला भेट दिल्यानंतर सरकारच्या 'प्रोव्हेडंट फंड' विभागासाठी असलेली जागा सुपरड्रीम्स रिअल इस्टेट लिमिटेड कंपनीने कोणत्या अधिकारात घेतली. लीज तसेच बांधकामाची परवानगी आहे का, कागदपत्रात फेरफार करण्यात आले आहेत का,आदी बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती ठाणे तहसीलदार कार्यालयाकडून देण्यात आली.